# बीएसएनएलमध्ये तरुणांना रोजगाराच्या संधी : महेश साठे

**कराड : पुढारी वृत्तसेवा**

अलीकडच्या काळात सुशिक्षित तरुणांची बेरोजगारी वाढत आहे. बेरोजगारीचे हे प्रमाण कमी करण्यासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. बीएसएनएल अंतर्गत तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होणार आहेत. त्यासाठी 'बीएसएनएल टेलिकॉम टेक्निशियन कोर्स' करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महेश साठे यांनी केले.



विद्यानगर : कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर बोलताना महेश साठे.

कराड येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमधील प्लेसमेंट सेल अंतर्गत आयोजित 'बीएसएनएल टेलिकॉम टेक्निशियनमध्ये रोजगाराच्या संधी' या विषयावरील ओरिएंटेशन प्रोग्रॅममध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीमती एस. आर. सरोदे होत्या.

याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. आर. आर. थोरात, डॉ. जे. यु. दीक्षित उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. श्रीमती एस. आर. सरोदे म्हणाल्या, बीएसएनएल अंतर्गत निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना माहीत व्हाव्यात म्हणून हा ओरिएंटेशन प्रोग्रॅम आयोजित केला होता. महाविद्यालयामध्ये 'बीएसएनएल टेलिकॉम टेक्निशियन हा कोर्स' लवकरच सुरू करण्यात येणार आहे. त्यात कराड व कराड परिसरातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.

सूत्रसंचालन प्रा. श्रीमती एस. पी. पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे निमंत्रक डॉ. ए. बी. मुळीक यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. एम. एस. बागवान यांनी करून दिला. प्रा. श्रीमती एस. आर. भालेराव यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.